# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक २७/०४/२०२५

## नागपुर ग्रामीण जिल्हयात खापरखेडा पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्यांवर गुन्हा नोंद , ५ अग्निशस्त्रांसह, ८ ॲन्ड्रॉईड मोबाईल आणि अंमली पदार्थ जप्त, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर आणि उपविभागिय पोलीस अधिकारी कन्हान यांची संयुक्त कारवाई

दिनांक २६/०४/२०२५ रोजी श्री अनिल मस्के ,उपविभागिय पोलीस अधिकारी , तथा सहा. पोलीस अधिक्षक सावनेर यांना गुप्तबातमीदारा मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, **सावनेर मधील गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा, वय २५ वर्षे, वार्ड नं. ३ चनकापूर हा वलनी येथील अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग च्या घरी हजर असुन त्यांच्या कडे अग्निशस्त्रे आहे.** अशी माहीती प्राप्त होताच श्री अनिल मस्के यांनी तात्काळ सदर माहीती मा.श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांना दिली.त्यांच्या मार्गदर्शनात श्री अनिल मस्के यांनी सदर माहीती श्री संतोष गायकवाड उपविभागिय पोलीस अधिकारी,कन्हान यांना देवुन केळवद पोलीसांचे एक पथक तयार करून रवाना केले. श्री संतोष गायकवाड यांनी सुध्दा उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय कन्हान येथील अंमलदाराचे पथक तयार केले. उपविभागिय पोलीस अधिकारी कन्हान यांचे पथक ,केळवद चे प्रभारी अधिकारी श्री अनिल राउत ,सहा.पोलीस निरीक्षक आणि पथक असे घटनास्थळी आरोपी अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग याचे घरी वार्ड क्र ३ वलनीयेथे पोहचले. पोलीसांना पाहुन आरोपी**अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग** यांने उडवाउडवीची उत्तरे दिली. खबरेप्रमाणे त्याच्या घरी पाहीजे आरोपी नामे **आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा** आणि **गब्बर दत्तूजी जुमळे, वय ३०वर्षे, रा. वार्ड नं. ३ वलनी** हे मिळुन आले. आरोपीतांनी पोलीसांना पाहुन पळुन जाण्याचा प्रयत्न केला परंतु पोलीसांनी शिताफितीने तिन्ही आरोपीतांना पकडले. तिन्ही आरोपीजवळ प्रत्येकी एक अग्निशस्त्र मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपी आशिष उर्फ गुल्लू

राजबहादूर वर्मा याच्या ताब्यातुन एक अग्निशस्त्र माउजर आणि एक मोबाईल आणि सिम जप्त केले.२.आरोपी नामे गब्बर दत्तूजी जुमळे  याच्या ताब्यातुनएक अग्निशस्त्र माउजर जप्त केले.३. आरोपी नामे  अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग याच्या ताब्यातुन एक अग्निशस्त्र माउजर आणि मोबाईल आणि सिम कार्ड जप्त केले. आरोपीच्या घरझडतीमध्ये दोन देशी बनावटीचा कट्टे , ३६ जिवंत काडतुसे, २ रिकाम्या पुगळी , ६ ॲड्रॉईड फोन आणि १०२८.०५ ग्रॅम  अंमली पदार्थ गांजा  सदृश्य वनस्पती व ईतर  साहीत्य मिळुन आले.

**सदर कारवाई मध्ये पोलीसांनी ५ अग्निशस्त्रे, ३६ जिवंत काडतुसे, २ रिकाम्या पुगळी, ८ ॲड्रॉईड फोन ,सिमकार्ड आणि १०२८.०५ ग्रॅम  अंमली पदार्थ गांजा सदृश्य वनस्पती व ईतर  साहीत्य असा एकुण  २,७१,८०० रु किंमती चा  मुद्देमाल जप्त केला.**

**आरोपी नामे १) आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा, वय २५ वर्षे, वार्ड नं. ३ चनकापूर, २) अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग, वय २९ वर्षे, रा. बलनी, ३) गब्बर दत्तूजी जुमळे, वय ३०वर्षे, रा. वलनी  यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन खापरखेडा येथे कलम ३,५,२५ भारतीय शस्त्र अधिनियमसहकलम ८ (सी) ,२० (बी) (२), २९ एन.डी. पी.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद तिन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**

**सदर गुन्हयाचे गांर्भिय लक्षात घेता मा. मा.श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या आदेशाने सदर गुन्हयाचे तपास कामी विशेष तपास पथक गठित करण्यात आले आहे. सदर विशेष तपास पथकाचे प्रमुख  श्री अनिल मस्के , सहा. पोलीस अधिक्षक, तथा उपविभागिय पोलीस अधिकारी , सावनेर  , विशेष तपास पथाकाचे सहायक श्री संतोष गायकवाड उपविभागिय पोलीस अधिकारी,कन्हान आणि सदर गुन्हयाचे तपास अधिकारी म्हणुन श्री अरविंद कतलाम,पोलीस निरीक्षक,(प्रभारी अधिकारी) खापरखेडा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नमुद विशेष तपास पथकाने**

सदर गुन्हयाचा सखोल तपास सुरू केला असुन सदर प्रकरणी अजुन दोन आरोपी नामे १. रोहीत देशराज सुर्यवंशी,वय ३२ वर्षे,रा वार्ड क्रं ३, चनकापुर ता. सावनेर आणि २. उदयभान गंगासागर चव्हाण ,वय ३२ वर्षे, रा. वार्ड क्रं ६ वलनी यांना अटक केली आहे. नमुद पाचही आरोपी पोलीस कोठडी रिमांड मध्ये असुन सदर विशेष तपाथ पथक नमुद गुन्हयाचा तपास करीत आहे.



